निर्चादित

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शांतीनगर, पोलीस स्टे. भिवंडी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** शांती नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0917 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/11/2023 15:36

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 26/07/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/07/2023
**Time From (वेळेपासून):** 15:03 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:03 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/11/2023 **Time (वेळ):** 15:09 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 015

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/11/2023 15:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्रतिक्षा हॉटेल येथे ,जकातनाका,भिवंडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



CamScanner

10 Tot

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संतोष राजाराम अंबिके

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पारापोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे,शांती नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे,शांती नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक नारायण एकनाथ जाधव ग्रामसेवक | | | 1. शहापुर,शहापूर ,ठाणे ग्रामीण , महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मूल्य (रु. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी संतोष राजाराम अंबिके, वय 47 वर्षे, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे सरकारतर्फे फिर्याद देतो की, तक्रारदार सौ.सुनंदा रमेश केणे, वय 46 वर्षे, व्यवसाय-टायपिंगचे दुकान, रा.जु.नांदुर्खी, हिरोबा बस स्टॉप जवळ, ता.भिवंडी, जि.ठाणे यांनी दिनांक 25/07/2023 रोजी फोनव्दारे कळविलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने योग्य ती पुढील कारवाई करण्याबाबत वरिष्ठांकडून आदेशीत करण्यात आले होते.
तक्रारीचे अनुषंगाने आम्ही पुढील कारवाई करणेसाठी दोन शासकिय पंच 1) श्री.ओमकार रविन्द्र पाटील, वय 29 , जवान, ब.न.111, रामा मार्केटींग, एफएल-1 घटक, कोनगाव, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे 2) श्री.राजेशकुमार बाळकृश्ण तारू, वय 46 वर्षे, जवान-नि-वानचालक, ब.न.68, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सी विभाग, ठाणे यांना लागलीच पाचारण करून, आमच्या केबिनमध्ये बोलावून, प्रथम सापळा पथकाची ओळख देवून, त्यानंतर तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगून, तक्रारीच्या अनुशंगाने पुढील कारवाई दिनांक 26/07/2023 रोजी करावयाची असल्याने, सदर दिवशी पंचांना जेबी नगर, भिवंडी येथे शासकिय वाहनाने नेवून, तक्रारदार सौ.सुनंदा केणे यांची पंचांशी व पथकाशी ओळख करून दिली. त्यानंतर तक्रारदार सौ.सुनंदा केणे यांनी लेखी स्वरूपात आणलेली तक्रार पंचांनी वाचून पाहीली असता, सदरची तक्रार दिनांक 25/07/2023 रोजी फोनव्दारे दिलेल्या तक्रारीप्रमाणेच दिनांकीत होती. सदर तक्रारीमध्ये आशय पुढीलप्रमाणे होता. तक्रारदार यांनी घराचे बांधकाम परवानगी मिळणेकरीता अर्ज केला असता, ग्रुप ग्रामपंचायत जु.नांदुर्खी येथील ग्रामसेवक नारायण जाधव यांनी सदर बांधकाम ठराव व घराचा बांधकाम नकाशा यावर सही देणेसाठी तक्रारदार यांचेकडे 40,000/- रू. लाचेची मागणी केली आहे. परंतु तक्रारदार यांना लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने तक्रारदार सौ.केणे यांनी दिनांक 26/07/2023 रोजी आमचेकडे भिवंडी येथे लिहून आणलेली तक्रार दिली. त्यानंतर आम्ही सदर तक्रारीच्या अनुशंगाने तक्रारदार व पंचास पडताळणी व सापळा कारवाईची माहिती दिली.
त्यानंतर सदर तक्रारीच्या अनुषंगाने लोकसेवक नारायण जाधव हे दिनांक 26/07/2023 रोजी त्यांच्या पंचायत समिती कार्यालय किंवा कार्यालयाच्या बाहेर भेटणार असल्याचे तक्रारदार यांनी सांगितल्यावर आम्ही लगेचच सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता व मार्गदर्शक सुचना करून, पडताळणी करण्याकरीता कोणास संशय येणार नाही असा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मपोना/जाधव यांच्या मार्फतीने लावून, तक्रारदार यांना पायी चालत व त्यांच्या मागे पंच श्री. पाटील यांना लोकसेवक यांच्या कार्यालयात पाठविले. ती वेळ ती वेळ 15:03 वा. होती. सदर ठिकाणी लोकसेवक मिळून न आल्याने तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल नंबर 7020102552 यावरून लोकसेवक जाधव यांचा मोबाईल नंबर 9923791540 यावर फोन करून, स्पिकरवर ठेवून, लोकसेवक यांना कोठे आहात म्हणून विचारले असता, लोकसेवक यांनी ते प्रतिक्षा हॉटेल येथे असल्याचे सांगतले. त्यानंतर तक्रारदार हे लोकसेवकास प्रतिक्षा हॉटेल येथे जावून भेटले व त्यांना भेटून त्यांचेशी इतर संभाषण करून, पुढे लोकसेवकाशी बोलल्या की, ''ऑडीटरच काय... आॅडीटरचे काय बोलले'' त्यावर लोकसेवक ''हा मग दयांना देवुन जा'' त्यावर तक्रारदार ''किती दयायचेत'' त्यावर लोकसेवक ''त्यांना 40,000/-रू दयायचे आहे मला'' त्यावर तक्रारदार ''मग मी 40000/-रू देवु'' त्यावर लोकसेवक ''नाही 40000/-रू नका देवु'' त्यावर तक्रारदार ''मग'' त्यावर लोकसेवक ''काय तुम्हाला पटल ते'' त्यावर तक्रारदार ''मग मी 2000/-रू. देईन चालेल'' त्यावर लोकसेवक ''अं'' त्यावर तक्रारदार ''मग सांगाना किती दयायचे'' त्यावर लोकसेवक ''दयाना'' त्यावर तक्रारदार ''माझ्याशी का लाजता तुम्ही बोलायला'' त्यावर लोकसेवक ''मी कशाला लाजु'' त्यावर तक्रारदार ''म्हणुनच मी बोलते किती देवु, मी 40,000/रू दयायचे का? मग किती दयायचे'' त्यावर लोकसेवक ''काय असल ते तुम्हाला बोललो होतो का एवढच दया तेवढ दया'' त्यावर तक्रारदार ''मी 2000/-रू दिलेतर चालतील? मी दोन हजार रूपये देईन'' त्यावर लोकसेवक ''तस करा होईल'' त्यावर तक्रारदार ''मग किती दयायचे'' त्यावर लोकसेवक ''गेव्हण्याच्या नात्यांन काय आपण एवढ नाही मागणार मी तिकड पण दयाव लागणार'' त्यावर तक्रारदार ''म्हणुनच बोलले मी किती दयायचे ते'' त्यावर लोकसेवक ''वीस'' त्यावर तक्रारदार ''किती'' त्यावर लोकसेवक ''वीस'' त्यावर तक्रारदार ''विस हजार का?'' त्यावर



CamScanner

लोकसेवक ''अडचणीत मेव्हण्याला नको मदत करायला'' त्यावर तक्रारदार ''पाच घ्यांना, पाच घ्या'' त्यावर लोकसेवक ''पाच बोटांनी नाय पाच बोटानी नाय एवढ अडचणीत तुम्ही संभाळुन नाही घ्यायला पाहीजे हे म्हणुन नाही अ..एक आपल प्रेम म्हणुन'' त्यावर तक्रारदार ''बघा तुम्ही जास्त घेतांना खरंच जास्त घेतांना माझी कॅपॅसीटी आहे का तेवढी'' त्यावर लोकसेवक ''नाही नाही 10 करून दया होवु दया' त्यावर तक्रारदार ''किती'' त्यावर लोकसेवक ''आता काय बोलु नका तुम्ही मला नका बोलायला लावु अन तुम्ही नका बोलु हया कामाचे किती होतील हया कामाचे झाले ना'' त्यावर इतर आवाज ''बाई 10 रू.दे'' त्यावर तक्रारदार ''हा 10 रू, हा देवुना 10 रूपये' त्यावर लोकसेवक ''तिला सांगा फक्त याच्या वर सही करून दे म्हणा तिला पण दयावे लागतील थोडे फार'' त्यावर तक्रारदार ''तिला मी देईन तुम्हाला किती देवु, पाच देवुना'' त्यावर लोकसेवक ''दहा दयाना, दहा दया ना मागच्या कामाचे पण तुम्ही दिले नाहीत मला... ना तुमच्या कडुन मागीतले मागचे'' त्यावर तक्रारदार ''काय होत'' त्यावर लोकसेवक ''वीस देतो त्याला वीस नंतर देतो त्याला अस म्हणतो'' त्यावर तक्रारदार ''वीस हजार'' त्यावर लोकसेवक ''मग ते एवढ सोपय का? तुमचा पाईन्ट जास्त घेतला त्यांनी'' त्यावर तक्रारदार ''अहो माझा पाईन्ट जास्त घेतला तुम्ही मला सांगाना फाईल आणुन दिली''

त्यानंतर लोकसेवक व तक्रारदार यांच्यामध्ये इतर संभाशण झाले. त्यानंतर तक्रारदार ''पाच घ्याना'' त्यावर लोकसेवक ''दयान मग'' त्यावर तक्रारदार ''आ...'' त्यावर लोकसेवक ''आज पाच दया उदया पाच दया'' त्यानंतर तक्रारदार ''माझ्याकडे नाही सध्या'' त्यावर लोकसेवक ''आहे आहे तुमच्याकडे आहे'' त्यावर तक्रारदार ''आज नाय आणले, उदया देतो घे मी आता नाय आणले पर्स आहे काय'' त्यावर लोकसेवक ''जेवढ आहे तेवढ'' त्यावर तक्रारदार ''अ.'' त्यावर लोकसेवक ''नका मेव्हण्याला हे करू'' त्यावर तक्रारदार ''उदया आणुन देते बस मी स्वता आणुन देते... पाच हजार देते'' त्यावर लोकसेवक ''पाच नही होणार'' त्यावर तक्रारदार ''पाच नाय होणार मग किती मध्ये होईल'' त्यावर लोकसेवक ''नका बोलायला लावु तिनदा तिनदा तेच नका बोलायला लावु'' त्यावर तक्रारदार ''उदया म मला भेटाल येथे'' त्यावर लोकसेवक ''हो'' त्यावर तक्रारदार '' उदया किती वाजे पर्यत आहे'' त्यावर लोकसेवक ''दहा'' त्यावर तक्रारदार ''चालेल चला'' असे बोलून झालेनंतर तक्रारदार तेथून निघून आले. ती वेळ 15.36 वा. ची होती.

त्यानंतर आम्ही पंचासमक्ष डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवरील मेमरी कार्डवर ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण लक्षपुर्वक ऐकले असता, लोकसेवक यांनी दहा दयाना, दहा दयाना मागच्या कामाचेही दिले नाही असे बोलले असता, त्यावर तक्रारदार पाच घ्याना असे बोलले असता, त्यावर लोकसेवक यांनी दयान मग, ''आज पाच दया, उदया पाच दया'' असे बोलून तक्रारदार यांचेकडे एकूण दहा हजार रूपये लाचेची मागणी केली आहे व सदर लाचेची रक्कम दिनांक 27/07/2023 रोजी घेवून बोलविल्याचे स्पश्टपणे दिसून आले. त्यानंतर आम्ही पंचाशी व तक्रारदार यांचेशी विचारविनीमय करून लोकसेवक यांनी दिनांक 27/07/2023 रोजी बोलविल्याने पुढील सापळा कारवाई दिनांक 27/07/2023 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर दिनांक 27/07/2023 रोजी पुढील कारवाई करावयाची होती. परंतु तक्रारदार सौ.केणे यांच्या मुलीची अचानक तब्वेत बिघडल्याचे, त्यांनी कारण सांगून, त्या मुलीकडे जाणार असलेबाबत कळवून, सदर दिवशी येवू नका., असा मोबाईल व्हॉट्सअप व्दारे आम्हास संदेष केला. करीता सदर दिवषी दिवषी पुढील कारवाई करता आली नाही.

त्यानंतर सौ.केणे यांनी कळविल्यावरून, आम्ही दिनांक 31/07/2023 रोजी सापळा पुर्व व सापळा परत कारवाई करणेसाठी भिवंडी येथे गेलो. त्यानंतर सदर ठिकाणी आम्ही सर्व कायदेषीर बाबींची पुर्तता व मार्गदर्षक सुचना करून, तक्रारदार सौ.केणे यांना लोकसेवक यांच्या कार्यालयात पाठविले असता, सदर ठिकाणी लोकसेवक जाधव हे कार्यालयात मिळून आले नाही. म्हणून तक्रारदार सौ.केणे यांनी लोकसेवक जाधव यांना फोनवरून संपर्क केला असता, लोकसेवक शहापुर येथे निघून गेल्याचे त्यांनी सांगून, तक्रारदार सौ.केणे यांना दिनांक 01/08/2023 रोजी भेटायास बोलविले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचाशी विचारविनीमय करून, पुढील कारवाई दिनांक 01/08/2023 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविले. दिनांक 01/08/2023 रोजी आम्ही पंच व सापळा पथकासह जाणेस निघालो. त्यावेळी आम्ही येत असलेबाबत तक्रारदार यांना फोनवरून संपर्क साधला असता, तक्रारदार यांनी फोन रिसीव्ह केला नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी ''आज येवू नका, माझा बीपी भरपूर लो झाला आहे. कालपासून माझी तब्वेत खुप बिघडली आहे. त्यामुळे मी ठाण्याला गोडबोले हॉस्पिटल येथे जात आहे. मला खुप मानसिक त्रास झालेला आहे त्या माणसामुळे'' असा संदेष व्हाट्सअपव्दारे आमच्या फोनवर केला. त्यानंतर सदरचा संदेश आम्ही पंचास दाखविला व सदर दिवशीची कारवाई तक्रारदार सौ.केणे यांनी आम्हास संपर्क केल्यानंतर करण्याचे ठरविले. परंतु सदर दिवषी तक्रारदार सौ.केणे यांनी संपर्क केला नाही.



CS CamScanner

त्यानंतर आम्ही वेळोवेळी तक्रारदार सौ.केणे यांच्या संपर्कात राहून, त्यांची तब्बेत कशी आहे याबाबत विचारपूस करीत होतो. दिनांक 03/08/2023 रोजी तक्रारदार सौ.केणे यांनी ''मी खुप टेन्शनमध्ये आहे व मी खुप माईंड डिस्टर्ब आहे. त्यामुळे मी तुमच्याशी आत्ता सध्या काही बोलू षकत नाही'' असा व्हॉट्सअप संदेश केला.

त्यानंतर दिनांक 23/08/2023 रोजी आम्ही स्टाफसह तक्रारदार सौ.केणे यांना भेटणेसाठी प्रथम त्यांचे भिवंडी येथील कार्यालयात गेलो. परंतू तक्रारदार सौ.केणे तेथे हजर नसल्याने आम्ही तक्रारदार सौ.केणे यांच्या राहते घरी गेलो. त्यावेळीही तक्रारदार सौ.केणे घरी नसल्याने आम्ही तक्रारदार सौ.केणे यांचे पती श्री.रमेश केणे यांच्या मोबाईल वरून तक्रारदार सौ.केणे यांना संपर्क साधला असता, तक्रारदार सौ.केणे यांनी ते डोंबिवली येथे हॉस्पिटलमध्ये उपचाराकरीता आले असून, सायंकाळी त्यांच्या कार्यालयात भेटणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर तक्रारदार सौ.केणे हया भिवंडी येथील त्यांच्या कार्यालयात सायंकाळी भेटल्या असता, आम्ही तक्रारदार सौ.केणे यांना पुढील कारवाई संदर्भात विचारणा केली, त्यावेळी तक्रारदार सौ.केणे यांनी त्या आजारी असल्याचे सांगून, सदरची कारवाई काही दिवसानंतर करण्याचे आम्हास सांगितले.

त्यानंतर दिनांक 12/09/2023 रोजी आम्ही तक्रारदार सौ.केणे यांना कॉल केला असता, तक्रारदार सौ.केणे हया कामानिमीत्त बाहेरगावी असल्याचे आम्हास सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार सौ.केणे यांना दिनांक 20/09/2023 रोजी पुन्हा कॉल करून विचारणा केली असता, त्यावेळी तक्रारदार सौ.केणे यांनी आम्हास ''लोकसेवक हा सध्या कार्यालयात हजर नसून, ते मला लाचेची रक्कम घेणेसाठी संपर्क करीत नसल्याचे सांगितले.''

त्यानंतर दिनांक 12/10/2023 रोजी आम्ही स्टाफसह तक्रारदार सौ.केणे यांच्या भिवंडी येथील केबिनकडे गेलो. त्यावेळी तक्रारदार सौ.केणे केबिनमध्ये हजर नसल्याने आम्ही तक्रारदार सौ.केणे यांना फोनव्दारे संपर्क केला. त्यावेळी त्यांनी बाहेर असल्याचे सांगितले.

त्यानंतर पुढील काही दिवस आम्ही तक्रारदार सौ.केणे यांचे संपर्कात होतो. परंतू तक्रारदार सौ.केणे यांना काही कौटूंबिक व खाजगी समस्या असल्याने, त्यांनी आम्हास कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही. करीता आम्ही दिनांक 27/10/2023 रोजी तक्रारदार सौ.केणे यांना मोबाईल व्हॉट्सअपव्दारे समजपत्र दिले. परंतु सदर समजपत्रावर कोणतेही उत्तर अथवा प्रतिसाद दिलेला नाही.

त्यांच्या या अषा वर्तणूकीतून त्यांना लोकसेवक जाधव यांच्याविरूध्द पुढील कार्यवाही करणेकरीता कोणत्याही प्रकारचे स्वारस्य नसल्याचे दिसून आले.. तसेच लोकसेवक जाधव यांनाही काही वाजवी संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्विकारणेसाठी तक्रारदार सौ.सुनंदा केणे यांना संपर्क अथवा भेटण्याचा प्रयत्न केलेला नाही व भविष्यात लाचेची रक्कम स्विकारतील असे दिसून येत नाही. म्हणून आम्ही गोपनीयरित्या लोकसेवक नारायण जाधव यांची पुर्ण माहिती घेतली असता त्यांचे नाव लोकसेवक नारायण एकनाथ जाधव, ग्रामसेवक, भिवंडी पंचायत समिती, भिवंडी रा. षहापुर असे असल्याचे समजले आहे.

सबब प्रस्तुत प्रकरणात तक्रारदार सौ.सुनंदा केणे हे तक्रार अथवा फिर्याद लिहून देण्यास असमर्थता दाखवित असल्याने, आम्ही स्वतः फिर्यादी होवून प्रस्तुत प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाई करीत आहोत.

तरी लोकसेवक नारायण एकनाथ जाधव, ग्रामसेवक, भिवंडी पंचायत समिती, भिवंडी रा.शहापुर यांनी तक्रारदार सौ. सुनंदा रमेष केणे यांनी घराचे बांधकाम परवानगी मिळणेकरीता अर्ज केला असता, ग्रुप ग्रामपंचायत जु.नांदुर्खी येथील ग्रामसेवक नारायण जाधव यांनी सदर बांधकाम ठराव व घराचा बांधकाम नकाशा यावर सही देणेसाठी तक्रारदार यांचेकडे 40,000/- रू.'दयावे लागतील असे सांगून, ताडजोडीअंती 10,000/- रू. लाचेची मागणी करून, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे (संशोधन 26 जुले 2018 अन्वये) कलम 7 प्रमाणे दंडनिय अपराध केला असल्याने माझी त्यांच्या विरुध्द सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.



CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
~~ARUN GANPAT GHOLAP~~ P.I. Rajashri Shinde ACB, Thane
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SHANKAR ANANDRA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अंमलदार
शांतीनगर, पो. ठाणे भिवंडी